महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

# महापारेषण समाचार

वर्ष-८ अंक-५ ऑक्टोबर- नोव्हेंबर -२०१४

**Dear Colleague,**

You all know infrastructure industry is base of an economy. Country's economic development is linked with development of infrastructure industry. As infra grow other sectors like transport, commerce, trade and industry grow, in turn it channelizes development. As you may be aware, there is difference between growth and development. Development is broad based and horizontal whereas growth is vertical and compartmental.

Transmission industry falls under infrastructure sector. Its operations comprises of laying required transmission network in the state that include various transformation capacities sub-stations and lines. Our network requirements come from up-stream and down-stream facilities of Mahagenco and Mahadiscom, Load Management and STU Plan.

We have stepped up our infrastructure year on year that may be seen from the fact that in the year 2003 our sub-station, lines and transformation capacity was 443 Nos. of sub-stations., 33,325 CKT KM lines and 49,876 MVA transformation capacity. In an average our Company adds up to 25 sub-stations and 1,500 CKT KM lines, yearly. As on 31-03-2014 our company has 608 Nos. sub-station, 42,578 CKT KM lines and 1,03,602 MVA transformation capacity. In the year 2013-2014 our HVAC system availability stood at 99.72% against MERC standard of 98% whereas HVDC system availability stood at 98.40% against MERC standard of 92%. Time to time our network augmentation has factored in maintain our system availability above MERC standard and we shall continue to do so in future.

Our Projects Department is entrusted to carry out project work. Since these are big projects, such work is done with the help of agencies under the expertise supervision of our Engineers and works. Our company has also chosen to utilize agencies to cater to our requirements.

In this process the scope is defined. It is decided by formulating various schemes. The schemes costing more than 10 crores are approved by the Board. After approval of the scheme, the tendering process starts. Tender conditions are decided as per the nature of work, and then tendering process is carried out. Those agencies offering best quote in tender procedure, are given Letter of Award (LoA) and accordingly execution commences.

As these are turnkey projects, engineering procurement is required to be done at large scale. These procurements are inspected by our projects team at factory or on-site locations after design approvals which are given as per Indian Standard (IS) and International Electro-technical Commission (IEC). Every scheme is required to be completed within time and cost. Every precaution is taken to avoid time and cost over-run. But today RoW and Forest clearances are major problems in execution of works of transmission lines. The scheme has validity of five years after that it is required to revalidate from the Board.



It is important to capitalize our assets at the earliest. For that purpose a scheme is required to get completed within time. The agency handovers the commissioned works and then work handovers from construction to the Operations and Maintenance. The Work Completion Report is prepared. At this point commissioning is recorded and from this stage onwards assets are considered to be capitalized. Till such time it is called Work-in-Progress (WIP). In our books of accounts WIP decreases and Asset increases as we completes and commissioned works. The power flow starts in the system and revenue starts generating. The entire process is now mapped in our ERP System. It has helped to effective monitoring of our project work.

There are various issues in projects completion such as timely procurement, inspection, execution, cash flow, RoW, etc. The Project Manager has to co-ordinate well with all the concerned agencies to get the work done.

Timely completion of projects is essential not only for our financial performance but also keeping our transmission network ready to sink with generation companies in Maharashtra including Mahagenco and Mahadistribution facilities.

At this juncture, I like to state that Transmission is the vital link between Generation and Distribution. Therefore we must keep this link uninterrupted, solid and strong. I look forward your continued dedication in this regard. My best wishes to all on festival season. I wish you and your family **Happy New Year!**

**Bipin Shrimali**
**Chairman and Managing Director**

## १३२ केव्ही उपकेंद्र काटोल येथे स्वच्छ भारत अभियान





अउदा बांध नि. संवसु परिमंडळ नागपूर अंतर्गत असलेल्या १३२ केव्ही उपकेंद्र, काटोल येथे २ ऑक्टोबर २०१४ रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती निमित्त स्वच्छ भारत अभियान राबविण्यास सुरुवात करण्यात आली. सदर अभियानात उपकेंद्राचे नियंत्रण अधिकारी श्री.अमरकांत गाडीगोणे, उपकार्यकारी अभियंता व सर्व कर्मचारी बंधुभगीनी उत्साहने भाग घेऊन मा.प्रधानमंत्री श्री.नरेंद्र मोदी यांनी सुरु केलेल्या स्वच्छ भारत अभियानास उत्स्फुर्त प्रतिसाद दिला. सर्व कर्मचाऱ्यांनी एकदिलाने स्वच्छतेची शपथ घेऊन आपले उपकेंद्र, घर, नजिकचा परिसर स्वच्छ करून मा.प्रधानमंत्री श्री.नरेंद्र मोदी यांनी दिलेल्या सादेला प्रतिसाद देण्याचा एकनिष्ठेने संकल्प केला.



त्यानंतर उपकेंद्र प्रमुख व कर्मचाऱ्यांनी उपकेंद्रातील परीसर स्वच्छ करण्यासाठी श्रमदान केले. तसेच त्यानंतर प्रत्येक कर्मचाऱ्याने आपआपले मनोगत व्यक्त केले. सदर कार्यक्रम उत्तमरित्या आयोजित केल्याबद्दल अउदा संवसु विभाग, नागपूर चे कार्यकारी अभियंता, श्री.एम.एस. तट्टे यांनी उपकेंद्र कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले तसेच सदर अभियान पुढे सुरु ठेवण्यास मार्गदर्शन केले.

## स्वच्छ भारत अभियान

दि. २ ऑक्टोबर रोजी गांधी जयंतीचे औचित्य साधून चाचणी विभाग, मानकापूर, नागपूर येथे कार्यकारी अभियंता श्री.एस.व्ही. सारडे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छ भारत अभियान उपक्रम राबविण्यात आले या प्रसंगी श्री.एस.व्ही. सारडे यांनी स्वत: श्रमदान केले तसेच त्यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण अधिकारी व कर्मचारी वृंद यांनी चाचणी विभागाच्या कार्यालय सभोवतालचा परिसर स्वच्छ करून गांधी जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी सर्व उपस्थितांना स्वच्छ भारत अभियानाचे महत्व विशद करण्यात आले. त्यानंतर सर्व उपस्थितांना स्वच्छतेची शपथ देण्यात आली स्वच्छ भारत अभियानाला दिलेल्या उस्फुर्त प्रतिसादाबद्दल श्री.सारडे, कार्यकारी अभियंता यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले. सदर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सर्व अधिकारी व कर्मचारी वृंद यांनी अथक परिश्रम घेतले.



## चर्चा सत्र



सांघिक कार्यालयातर्फे अउदा बां.नि. संवसु. परिमंडल, पुणे येथे दि. ५.११.२०१४ रोजी आयोजित मनुष्यबळ आकृति बंध आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. सांघिक कार्यालयातर्फे श्री.एस.टी.शिंदे, मुख्य अभियंता (मासंवि), श्री.सुगत गमरे, महाव्यवस्थापक (मा.सं.-तांत्रिक), सौ.हविशा जगताप, वरिष्ठ व्यवस्थापक (मा.सं.), सौ.श्रद्धा गंद्रे, उपव्यवस्थापक (मा.सं.) यांचे सदर बैठकीस मार्गदर्शन लाभले.

पुणे परिमंडलातर्फे श्री.पी.आर. देवरे, मुख्य अभियंता, श्री.एस.बी. भोळे, अधीक्षक अभियंता, श्री.सतिश गायकवाड, अधीक्षक अभियंता (स्थापत्य), श्री.आर.डी. चव्हाण, अधीक्षक अभियंता, श्री.राहुल सुतार, सहा. महाव्यवस्थापक (मा.सं.), श्री.वैजनाथ बिरदार, कार्यकारी अभियंता, श्री.सचिन कडलग, व्यवस्थापक (मा.सं.), श्री.सतिश काळे, उपव्यवस्थापक (मा.सं.) श्री.प्रशांत डांगले, एच.आर. चॅम्पियन उपस्थित होते.

तसेच श्री.रोहिदास म्हस्के, मुख्य अभियंता, अऊदा बां.नि.संवसु परिमंडळ, औरंगाबाद व श्री.अनिल कोलप, अधीक्षक अभियंता, कराड हे सुध्दा उपस्थित होते.

सदर बैठकीत मनुष्यबळ आकृति बंध विषयावर विस्तृत चर्चा होवून आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करण्यासाठी नव्याने मंजूर होणाऱ्या विविध पदांचा आढावा घेण्यात आला. पुणे परिमंडलातर्फे श्री.बी.पी. ओहोळ, प्रमुख लिपीक यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले.

## KNOW YOUR SUB-STATION



अउदा बां.नि.संवसु परिमंडळ, पुणे अंतगर्त "Know Your Sub-Station" हा वेगळा प्रशिक्षण कार्यक्रम सुरु करण्यात आला. उपकेंद्रातील कामाचे स्वरूप ज्यामध्ये उपकेंद्रावर एकुण आत येणार विजेचा भार, त्या विजेच्या भाराचे योग्य प्रमाणात विभाजन करून त्या भाराचे इतरत्र जाणारे फिडरनुसार विजेचे व्यवस्थापन हे उपकेंद्रातील विविध उपकरणाद्वारे नियंत्रण कशा प्रकारे केले जाते, याची माहिती प्रादेशिक प्रशिक्षण केंद्रात देण्याऐवजी ठराविक उपकेंद्रात त्याचे प्रात्यक्षिकासह माहिती या प्रशिक्षणामध्ये अंतर्भुत करण्यात आली असून प्रारंभी Pune Ring Main मधील संवेदनशील असलेल्या २२०केव्ही फुरसुंगी उपकेंद्रात यावेळी प्रायोगिक तत्वावर दि. ७.११.२०१४ रोजी उपकेंद्र प्रमुख, अभियंते, ऑपरेटर्स यांना एकत्र आणुन Load Flow, Scada, Disaster Management, Wave Trap, Control Panel, Battery Room व यार्डातील उपकरणे, Transformers, Isolators, Insulators, Circuit Breakers यांची कार्यप्रणाली उपस्थितांना अवगत करून देण्यात आली.

सदर प्रायोगिक प्रशिक्षणास श्री.संजीव भोळे, कु.विजया मुखेडकर-अधीक्षक अभियंते, श्री.महेंद्र काटेंगे, श्री.राजीव देव-कार्यकारी अभियंते, श्रीचित्रे, श्री.पाटील-अतिरिक्त कार्यकारी अभियंते व इतर अभियंते, वाहिनी कर्मचारी उपस्थित होते.

सदर प्रशिक्षणाची संकल्पना व संचलन श्री.अशोक देशपांडे, अतिरिक्त कार्यकारी अभियंता, जेजुरी प्रशिक्षण केंद्र यांनी यांच्या कंपनीच्या कामाच्या पूर्वानुवावरून साकारली असून अशा प्रकारचे प्रशिक्षण महाराष्ट्रातील ईतर उपकेंद्रातून सुध्दा केले जाणार आहे.

## नाट्यस्पर्धांचे आयोजन

महापारेषण कंपनीत नाट्यस्पर्धांचे आयोजन करण्यात आले व तद्नुसार संपूर्ण महाराष्ट्रात कलाप्रेमीना आपल्या सुप्तगुणांना वाव देण्याची संधी प्राप्त झाली.

परिमंडळात मंडळ स्तरावर नाट्य स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. राज्यस्तरीय स्पर्धेसाठी परिमंडळ स्तरावर निवड झालेल्या नाटकांच्या स्पर्धा कराड येथे आयोजित करण्यात येणार आहेत.

सर्व कलाकारांचे त्याच्या सहभागाकरीता मन:पूर्वक आभार!

## महापारेषण कंपनीतील नियुक्ती /निवृत्ती माहे ऑक्टोबर ते नोव्हेंबर २०१४

**नियुक्ती:**

| अ.क्र | नाव | पद | पदस्थापनेचे ठिकाण | दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | श्री.प्रदीप लक्ष्मण लाखकर | अधीक्षक अभियंता (स्थापत्य) | अउदा बां.नि संवसु परिमंडळ, अमरावती | २५.११.२०१४ |

**निवृत्ती**

| अ.क्र | नाव | पद | पदस्थापनेचे ठिकाण | दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. बाबाराव हीरामन रामटेके | अधीक्षक अभियंता (पारेषण) | राज्यभार प्रेषण केंद्र, कळवा | ३०.११.२०१४ |
| २ | श्री. सुरेश वामनराव पाठक | अधीक्षक अभियंता (स्थापत्य) | अउदा बां.नि संवसु परिमंडळ, अमरावती | ३०.११.२०१४ |

## महापारेषण कंपनीचा ९वा वर्धापन दिन सोहळा






दि. ७.७.२०१४ रोजी महापारेषण कंपनीचा ९वा वर्धापन दिन अऊदा बांधकाम निसंवसु परिमंडळ, कराड अंतर्गत येणाऱ्या स्थापत्य मंडल, बांधकाम मंडल व संवसू मंडल कोल्हापूर यांचे संयुक्त विद्यमाने विविध कार्यक्रमांनी साजरा करण्यात आला.

सदर दिवशी प्राचार्य मा.डॉ.वसंत हेळवी, राजाराम महाविद्यालय कोल्हापूर यांचे हस्ते रक्तदान शिबीराचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी ४५ कर्मचाऱ्यांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपण्याचे महान कार्य केले. रक्तदान शिबीरामधील महिला कर्मचाऱ्यांचा सहभागही दखल घेण्यासारखा होता. यावेळी सलग ५५ वेळा रक्तदान करून विक्रम करणाऱ्या श्री.दिपक सुर्यवंशी, बापट कॅम्प उपविभाग यांचा मा.श्री.गणपत मुंडे, मुख्य अभियंता, अऊदा बांधकाम निसंवसु परिमंडळ, कराड यांचे हस्ते शाल व श्रीफळ देवून गौरव करण्यात आला.

यानंतर झी मराठी व ई टीव्ही मराठी वरील प्रसिध्द विनोदी कलाकार, हास्यसम्राट फेम श्री.संतोष शिंदे व दादांचा वारसदार फेम श्री.नितीन कुलकर्णी यांचा मनोरंजनाचा कार्यक्रम सादर करण्यात आला.

कोल्हापूर येथील महापारेषण कर्मचाऱ्यांनी नोंदणी केलेल्या ''एमएसईटीसीएल एम्प्लॉईज रिक्रीएशन क्लब''चे प्रमाणपत्र प्रमुख पाहुणे श्री.हेळवी व मा.श्री.गणपत मुंडे, मुख्य अभियंता, अऊदा बां. नि. संवसु परिमंडळ, कराड, यांचे हस्ते या क्लबचे अध्यक्ष श्री.संदीप हाके यांना प्रदान करण्यात आले. या क्लबच्या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रम हाती घेण्यात येणार आहेत.

दुपारच्या सत्रामध्ये कोल्हापूर मधील तिन्ही मंडल कार्यालयातील हौशी कर्मचारी वृंदातर्फे श्री.अशोक पाटोळे लिखील दोन अंकी नाटक ''मी माझ्या मुलांचा'' सादर केले गेले. या नाटकातून सध्याच्या जिवनशैलीवर प्रकाश टाकून कलाकारानी सर्व प्रेक्षकांची मने जिंकून घेतली.

हा कार्यक्रम यशस्वी होणेसाठी कराड परिमंडलाचे मुख्य अभियंता मा.श्री.गणपत मुंडे यांचे विशेष सहकार्य व मार्गदर्शन लाभले. तसेच श्री.चिंचवाडकर, श्री.संदीप हाके व श्री.साळे, अधीक्षक अभियंते यांचे अखत्यारीतील सर्व मंडल, विभाग, उपविभाग, उपकेंद्रातील कर्मचारी अभियंते यांनी विशेष परिश्रम घेतले. राजाराम महाविद्यालयाचा हॉल उपलब्ध करून दिल्याबद्दल श्री.हेळवी व इतर प्राध्यापकांचे आभार मानण्यात आले.





# पाहणी दौरा

## वर्धा



दि. १६.१२.२०१४ ला माननीय श्री.बिपीन श्रीमाळी, अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक व माननीय श्री.ओ.के. एम्पाल संचालक (संचलन) यांचे सोबत श्री.लक्ष्मीदास सोनकवडे मुख्य अभियंता नागपूर परिमंडळ नागपूर यांनी प्रमुख भांडार 'क' वर्धा येथे भेट देवून तेथील कामकाजाबद्दल विचारणा केली. प्रमुख भांडार 'क' वर्धा येथील कार्यकारी अभियंता श्री.अनिल पाटील यांनी सर्वप्रथम मान्यवराचे स्वागत केले. प्रमुख भांडाराची कार्यपद्धती Inventory Reduction & Disposal of Scrap तेथील कार्यरत कक्ष, भांडारातील कस्टडी मध्ये येणारे व जाणारे साहित्य यांनी ERP च्या माध्यमातून GR(Good receipt), GI (Good Issue) कशा प्रकारे कशा प्रकारे होते ERP System मधून Gate pass कशा प्रकारे Generate केल्या जाते. गोडाऊन मध्ये Differential & backup relay for retrofitting work तसेच लाईन सबस्टेशन करीता लागणारे साहित्य व त्याचा वापर कशा पध्दतीने केला जातो याची माहिती अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक व संचालक (संचलन) यांना देण्यात आली.

श्री.लक्ष्मीदास सोनकवडे, मुख्य अभियंता यांनी प्रमुख भांडार 'क' मध्ये असलेले साहित्य नवीन सबस्टेशन करीता कसे वापरण्यात येईल याबद्दल अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांना पटवून दिले. तसेच सुरक्षितेच्या



दष्टिकोणातुन CCTV कॅमऱ्या मध्ये दिवसाचे व रात्रीचे निगराणीचे रेकार्डींग कसे केल्या जाते याबद्दल माहिती देण्यात आली. व त्यानंतर प्रमुख भांडार 'क' परिसरात माननीय अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक व संचालक (संचलन) यांचे हस्ते वृक्षारोपणाचा कार्यक्रम पार पडला. एकंदरीत प्रमुख भांडारातील कामकाजाबद्दल समाधान व्यक्त केले.

याप्रसंगी श्री.प्रमोद सावंत, कार्यकारी अभियंता, कंस्ट्रक्शन विभाग - २, श्री.दिनेश तामगाडगे, कार्यकारी अभियंता, वर्धा, श्री.मनीष खत्री, कार्यकारी अभियंता चाचणी विभाग, श्री.अमोल जामगडे, उपकार्यकारी अभियंता, श्री.संजय दुराणी, उपव्यवस्थापक, श्री.भौलेश भुरे, श्री.जगदिश गुजर, श्री.अशोक मुंद्रे, श्री.नंदनकिशोर बावणे, श्री.अरूण तळोकार अशाप्रकारे प्रमुख भांडार कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते.

## नाशिक



अउदा बांधकाम नि. संवसु परिमंडळ, नाशिक कार्यालयास दिनांक २०.०९.२०१४ रोजी सकाळी ९.३० वाजता मा.श्री.बिपीन श्रीमाळी, अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मुंबई यांनी भेट दिली. यावेळी मा.मुख्य अभियंता श्री.बी.टी. राऊत यांनी अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

दिनांक २०.०९.२०१४ रोजी नाशिक परिमंडळ कार्यालयात आयोजित आढावा बैठकीमध्ये त्यांनी विविध कामांचा आढावा घेतला. तसेच नविन प्रशासकीय इमारतीची पहाणी करून कामाबाबत समाधान व्यक्त केले.

यावेळी त्यांच्या सोबत मा.श्री.ओ.के. एम्पाल, संचालक (संचलन/प्रकल्प) व श्री.बी.टी. राऊत, मुख्य अभियंता तसेच श्री.एस.पी. वसेकर, श्री.एम.एल. गुट्टे, श्री.एस.एल. अत्राम, श्री.भगत, श्री.आर.एस. कांबळे इत्यादी अधीक्षक अभियंते व श्री.प्रशांत चौधरी, सहा.महाव्यवस्थापक (मासं), श्री.मिलींद घोलप, सहा. महाव्यवस्थापक (लेखा) हे देखील उपस्थित होते.

सदर आढावा बैठीकीवेळी परिमंडळ कार्यालय, मंडळ कार्यालय तसेच विभागीय कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाण दिनी आदरांजली

### वाशी परिमंडळ

शनिवार दिनांक ६ डिसेंबर, २०१४ रोजी अउदा बांधकाम नि. संवसू परिमंडळ वाशी कार्यालयात महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना ५८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त आदरांजली वाहण्यात आली. या प्रसंगी वाशी परिमंडळाचे मुख्य अभियंता, श्री.विकास बढे यांनी महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुजन व पुष्पहार अर्पण करून आदरांजली अर्पण केली. तसेच महामानवास अधीक्षक अभियंता श्री.सातपूते, सहाय्यक महाव्यवस्थापक (विवले), श्रीमती डुबेवार, वरिष्ठ व्यवस्थापक (मा.सं.) श्री.कुलकर्णी, कार्यकारी अभियंता श्री.वेस्ली तसेच वाशी परिमंडळ व चाचणी मंडळ वाशी कार्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्याकडूनही आदरांजली अर्पण करण्यात आली.



### मुख्य कार्यालय, मुंबई

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा ५८वा महापरिनिर्वाण दिन ६ डिसेंबर २०१४ महापारेषण कंपनीत मुख्य कार्यालयामध्ये आयोजित करण्यात आला. मुख्य कार्यालयात या दिवशी बुध्द वंदना घेवुन डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस मानवंदना दिली. या प्रसंगी संचालक (वित्त), कार्यकारी संचालक (संचलन), कार्यकारी संचालक (मासं) व मुख्य महाव्यवस्थापक (मासं) यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याची माहिती दिली.

## भारताचे संविधान

''जहाँ डाल-डाल पर सोने की चिड़िया करती है बसेरा, वो भारत देश है मेरा!'' असे कधी काळी म्हटले जात असे, आणि आज कुठे आणुन ठेवला आहे असे सुर ऐकु येतात.

अशी परिस्थिती का येते याचे अवलोकन करणे गरजेचे आहे. त्याचे मुळ आपल्याला आपल्या राज्यव्यवस्थेमध्ये सापडते. राज्यव्यवस्थेची घडी, रचना व निर्मिती भारत देशात संविधानामार्फत झाली.

लोकांनी लोकाकरिता, लोकांसाठी चालवलेले सरकार म्हणजे लोकाशाही! समानता, बंधुता आणि सहकार या तत्वांवर संविधान विराजमान झाले. मुलभूत हक्क, नागरिकांचे कर्तव्य व राज्यासाठी दिलेले मार्गदर्शक तत्वे हे त्यातील मुळ घटक संसदिय प्रणाली त्यामध्ये लोकसभा, राज्यसभा, विधानसभा, विधानपरिषद, संविधानात्मक पदे, त्यांचे अधिकार, भुमिका याबाबत तरतुदी संविधानामध्ये करण्यात आलेले आहे.

तसेच काळानुरुप या घटनेमध्ये बदल करता याता या करीता प्रणाली नमुद करण्यात आली आहे. त्यामुळे आजतागायत भारत देशाचे प्रशासन सुरु आहे. भारत एकसंघ राहण्यामध्ये भारताचे संविधान फार मोठी भुमिका पार पाडते नाहीतर वैविधतेने नटलेल्या या देशाची शकले पडावयास वेळ लागला नसता. जगात इतरत्र असे घडलेले आपल्याला दिसते किंवा त्याचे सार्वभौमत्व टिकवण्यास प्रचंड प्रयत्न करीत असल्याचे आपल्याला दिसत आहे. त्यामुळेच जगभरातुन भारत देशाच्या संविधानाचा अभ्यास केला जात आहे व त्यातील तरतुदी आपल्या घटनेमध्ये उतरवण्याचा प्रयत्न करताना देश दिसत आहे.

मग परिस्थिती बदल का? याचे कारण आपली मानसीकता, संविधानाने दिलेल्या तरतुदी यांची अंमलबजावणी कागदवर होते व वस्तुस्थीतीत अनेक त्रुटी आपल्याला दिसतात. असे म्हणतात कोणतीही चांगली गोष्ट घडवण्यामागे दोन गोष्टी महत्वाच्या असतात त्याम्हणजे Will आणि Skill.

आपल्या देशाकडे संविधानरूपी Skill आहे मात्र त्यास अंमलबजावणी करीता लागणारी Will आपल्यामध्ये नाही. त्यामुळे घटनेचा दुरुपयोग झालेला आपण पाहतो.

आजच्या दिनी चला आपण कटिबध्द होऊया की भारत देशाच्या संविधानाचे आपण काटेकोरपणे पालन करू. सर्व विभुतिंना तसेच विशेष करून संविधान समितीचे अध्यक्ष भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना मी अभिवादन करतो.

भारताचे संविधान चिरायु होवो.

**जय हिंद! जय भारत!**

**-श्री.चंद्रशेखर बोराडे**
**वरिष्ठ व्यवस्थापक, (मासं)**
**सांघिक कार्यालय, मुंबई**

### २६ नोव्हेंबर, संविधान दिन साजरा

२६ नोव्हेंबर हा दिन संविधान दिन म्हणून साजरा करण्यात येतो. महापारेषण कंपनीत मुख्य कार्यालयात हा दिन साजरा करण्यात आला. संविधान च्या प्रास्ताविकेचे वाचन करून त्याबद्दल कटीबध्द राहण्याची शपथ घेण्यात आली.

अनेक कार्यालयात या दिनी व्याख्यान, प्रबोधन तसेच परिसंवादाचे कार्यक्रम घेण्यात आले.

**भारताचे संविधान चिरायु होवो!**

## म.रा.वि.मं. सुत्रधारी कंपनी मर्यादित अंतर्गत महावितरण, महानिर्मिती व महापारेषण कंपनीतील कर्मचाऱ्यांना ग्रुप मेडिक्लेम इन्शुरन्स पॉलिसी

म.रा.वि.मं. सुत्रधारी कंपनी मर्यादित अंतर्गत महावितरण, महानिर्मिती व महापारेषण कंपनीतील कर्मचाऱ्यांचा वेतन पुनर्निर्धारण करार व्यवस्थापन प्रतिनिधी व कामगार संघटना प्रतिनिधी यांच्यामध्ये दि. २६.०६.२०१४ रोजी करण्यात आला होता. वेतन पुनर्निर्धारण करारातील मुद्दा क्र. ८नुसार कर्मचारी व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या कुटूंबियातील ०५ सदस्यांसाठी ग्रुप मेडिक्लेम इन्शुरन्स पॉलिसी नव्याने सुरु करण्याबाबतचा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला होता. त्याअनुषंगाने कर्मचारी व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या कुटूंबातील ०५ सदस्यांकरिता MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy ओरिएंटल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड, पुणे यांचे मार्फत लागू करणेबाबतची कार्यवाही अंतिम टप्प्यात आली आहे.

ओरिएंटल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड, पुणे यांनी MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy सुरु करण्याकरिता कर्मचारी व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या कुटूंबातील ०५ सदस्यांची माहिती तातडीने देण्याबाबतची विनंती दि. २०.११.२०१४च्या ई-मेलद्वारे केली आहे.

कर्मचाऱ्यांने त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या कुटुंबातील ०५ सदस्यांची माहिती पाठविताना खालील सुचनांचे पालन करावे.

वेतन पुनर्निर्धारण करारातील मुद्दा क्र. ८.२ मध्ये नमूद केल्यानुसार कुटुंबाची व्याख्या शासनाच्या धर्तीवर खालीलप्रमाणे राहील.

**कुटूंब म्हणजे:**

१) कर्मचारी/अधिकारी यांची पत्नी किंवा पती,

२) कर्मचारी/अधिकारी यावर अवलंबित असणारी मुले/सावत्र मुले / कायदेशीर दत्तक घेतलेली मुले.

(विमा कंपनीच्या नियमानुसार अवलंबित मुले म्हणजे.)

i) २१ वर्षे वर्यापर्यंत असलेला मुलगा किंवा मुलगी अवलंबित समजण्यात येईल.

ii) १८ वर्षापेक्षा जास्त वय असलेला मुलगा/मुलगी नोकरी करत असल्यास अथवा मुलगी विवाहीत असल्यास त्यांना अवलंबित समजण्यात येणार नाही.

iii) तथापि, २६ वर्षापर्यंत वय असलेल्या मुलाचे शिक्षण सुरु असेल व तो कर्मचाऱ्यावर पूर्णपणे अवलंबित असेल तर अशा मुलाला अवलंबित समजण्यात येईल.

iv) मुलगी अविवाहित असल्यास तिचा विवाह होईपर्यंत ती कर्मचाऱ्यांवर पूर्णपणे अवलंबित आहे असे समजण्यात येईल.

३) कर्मचारी /अधिकारी यावर पूर्णपणे अवलंबून असलेले कर्मचारी / अधिकारी यांचे आई-वडिल, महिला कर्मचाऱ्यास तिच्यावर पूर्णपणे अवलंबून असलेल्या आणि तिच्याबरोबर राहत असलेले तिचे आई-वडिल किंवा सासु-सासऱ्यांपैकी एकाची निवड करता येईल.

४) कर्मचारी / अधिकारी यावर पूर्णपणे अवलंबून असलेला १८ वर्ष पेक्षा कमी वय असलेला अविवाहित भाऊ.

५) कर्मचारी / अधिकारी यावर पूर्णपणे अवलंबून असलेल्या अविवाहीत बहिणी व घटस्फोटीत बहिणी, त्यांच्याबाबत त्यांचे वय लक्षात घेऊ नये.

६) या नियमाखालील प्रतिपूर्ति करण्यासाठी, कर्मचारी / अधिकारी यांची अंशकालीन नोकरी व्यतिरिक्त अन्य नोकरीस असलेली मुले आणि अविवाहीत मुली लाभदायक नोकरीत असल्याचे समजण्यात येईल आणि ती त्यांच्यावर अवलंबून असल्याचे मानण्यात येणार नाही. कर्मचारी / अधिकारी यांवर अवलंबून असल्याचे आईवडिलांचे दरमहा किमान उत्पन्न अथवा मुळ निवृत्ती वेतन रु. ५०००/- पर्यंत आहे, असे आईवडिल तसेच घटस्फोटीत बहीण हे कर्मचाऱ्यांवर अवलंबून आहेत असे समजण्यात येईल.

महापारेषण कंपनीतील सर्व कर्मचाऱ्यांनी विहित प्रपत्रामध्ये अपली माहिती संबंधित कार्यालया कडे पाठवावी.

## अउदा बांधकाम नि संवसु परिमंडळ अमरावती

दिनांक २८.११.२०१४ रोजी सायंकाळी ७ वाजता अमरावती परिमंडळांतर्गत येत असलेली २२० केव्ही अमरावती-अंबाझरी विद्युत वाहीनी ही यशस्वीरित्या आटोरिक्लोज्ड झाली. परंतु वाहीनी प्रथमतः कशामुळे ट्रीप झाली हे शोधण्याकरीता पेट्रोलींग करतांना मनोरा क्र. ३३२ खाली एक माकड भाजलेले मृत अवस्थेत आढळुन आले व तसेच दुसरे माकड भाजलेल्या जखमी अवस्थेत मनोऱ्यावर बसलेले आढळुन आले. त्या माकडास कर्मचाऱ्यांनी मनोऱ्यावरून खाली उतरविले त्यामुळे पुढील होऊ शकणारा अनर्थ टळला.

वरील कार्यवाही अमरावती परिमंडळ अंतर्गत अमरावती विभागातील २२० केव्ही वाहीनी देखभाल उपविभाग, अमरावती अंतर्गत कर्मचाऱ्यांनी यशस्वीरित्या पार पाडली. माकडांचा उपद्रव होऊन वाहीनी बंद पडु नये या करीता ॲन्टीक्लाइबींग यंत्रणा बसविण्याचे ठरले आहे.

## गुण गौरव



कु.प्रियंका श्रीशैलप्पा बंदिछोडे ही मार्च २०१४ मध्ये घेण्यात आलेल्या उच्च माध्यमिक शालांत परिक्षेत १२वी सायन्स मध्ये ८५.०८% गुण मिळवून राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर येथून उत्तीर्ण झाली असून MHCET २०१४ परीक्षेमध्ये ७२० पैकी ४३९ गुण मिळवुण राज्यात NTC प्रवर्गातून ३४ वा क्रमांक पटकाविला आहे. तिला डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नांदेड येथे MBBS साठी प्रवेश मिळाला आहे.

२२०केव्ही उपकेंद्र हरंगुळ येथील श्री.श्रीशैलप्पा तुकण्णा बंदिछोडे, वरिष्ठ यंत्रचालक यांची ती कन्या आहे. या उज्ज्वल यशाबद्दल विभागीय कार्यालय प्रमुख कार्यकारी अभियंता, श्री.आर.एफ. पवार, उपकार्यकारी अभियंता श्री.एस.के. फुलारी,सर्व सहाय्यक अभियंते व सहकारी बांधवांतर्फे शुभेच्छा देण्यात आल्या. तसेच पुढील वाटचालीसाठी महापारेषण कंपनी तर्फे हार्दिक शुभेच्छा!

## क्रिडा



महावितरण-महापारेषण-महानिर्मिती कंपनी अंतर्गत दरवर्षी प्रमाणे होणारी लोकाधिकार-२०१४ क्रिकेट स्पर्धा दि. १३.१२.२०१४ रोजी दहिसर स्पोर्ट्स क्लब, दहिसर (पूर्व) येथे पार पडली. सदर स्पर्धेत श्री.मंगेश शिंदे, सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं.), (कर्णधार) यांचा ''प्रकाशगंगा-ब'' संघ उपविजेता ठरला. संपूर्ण स्पर्धेत ''प्रकाशगंगा-ब'' संघातील खेळाडू श्री.सुनील नेहरकर, श्री.विनोद गायकवाड, श्री.रूपेश गजरे, श्री.विनोद सोनावणे, श्री.राजेश पाटील, श्री.अमेय टिकम यांनी आपल्या संघाकरिता उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले.

## OPEN HOUSE MEETING PMS

Open House Meetings of zones have been held to inculcate PMS and EES in our organisation. This initiative concluded with an Open House held on 31.10.2014 for employees of C.O., Mumbai and SLDC, Kalwa.

Input collected from Open House are being implemented by the HRD department.

## STAFFING NORMS REVIEW COMMITTEE MEETING

A Staffing Norms Review of Technical Cadre was under consideration of the management. The Director (O/P) has constituted a committee to this purpose comprising the CE (HRD) as leader, CE, EHV CC O&M Zone, Aurangabad, GM (HR-T) and SE, EHV O&M Circle, Karad as member.

This committee meeting held at zone level to seek inputs from all concerned. Uptill now Karad, Pune and Vashi zone meeting area held. Meeting of Nashik, Nagpur and Amravati zones are held on 17.12.2014, 19.12.2014 & 20.12.2014.

After completing meeting in all zones, committee shall submit its report to the management.

## Alignment– Performance Management System

Management output is results. In order to get this output the process is called alignment. Unless and until this process is properly laid down, output is not guaranteed. These are different ways of alignment such as Balance Scorecard, Employee Engagement, TQM, ISO, etc. But the time tested and sustainable process is Performance Management System.

A sound Performance Management System aligns employees with targets and thereby company achieves its vision, mission and objectives. In our company also we have introduced KRA based new Performance Management System for employees in Pay Group I & II from the year 2010-2011 with an aim of aligning employees with targets. This new PMS objectives are transparency, objectivity, accountability and easy in implementation. There are three stages namely, Performance Planning, Mid-Year review and End-Year review. These stages are important and to be held in time, i.e. Performance Planning in April-May, Mid-Year review in Oct-Nov and End-Year review in April-May-June.

A stage of Performance Planning is key stage. It should be done in consideration of role and responsibility of the individual. Targets should be assigned properly, there should not be underplay and overplay i.r.o. target assignment, otherwise Performance Review will not be fair and proper. All other aspects are simple but need to follow diligently to enable fair Performance Assessment.

At the end, I request Pay Group I & II employees to get into habit of filling Performance Appraisal at the beginning of the year and not after completion of year. In case you have any doubt the Performance Appraisal Cell at C.O., Mumbai may be contacted. I request all to assist management in performance culture building and task of aligning employees.

**With Best Wishes!!!**

**- From the Desk of ED(HR)**

संपादक : श्री.संदीप सुरवसे, व्यवस्थापक (मा.सं.), प्रभारी जनसंपर्क अधिकारी
E-mail : prohr@mahatransco.in
पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, महापारेषण समाचार, प्रकाशगंगा इमारत, महापारेषण कंपनी मर्यादित, प्लॉट नं. सी. - १९, ई. ब्लॉक, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१ (खाजगी वितरणासाठी)

Printed & Published by PRO For Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd., Printed at Hema Arts : 121, Sagar, Prabhat Ind., Estate, Near Dahisar Checknaka, W. Exp. Highway, Dahisar (E), Mumbai - 400 068. Ph : 2896 8221
& Published at Prakashganga, Bandra Kurla Complex, Mumbai - 400 051.
The Company accepts no responsibility for the matter published in the journal.